# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ३६३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२९/०६/२०१६.

**१) मोटार सायकलची चोरी. :—**

दिनांक २७+२८/०६/०१६ रोजी रात्र दरम्यान फिर्यादी अमोल अरूण शुक्ला वय ३२ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड पेट्रोलपंप ठाणा यांची बजाज पल्सर १५० सीसी मोटार सायकल क्र. एमएच ३६ एम ५९८६ कि. ३०,०००/—रु. ची हि त्यांच्या अंगणात ठेवली होती. ती कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७९ भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलसह मोबाईलची चोरी. :—**

दिनांक २७/०६/०१६ रोजी २२.३० वा. दरम्यान फिर्यादी नाजीब बेग मुस्तकीम मिर्झा वय ३० वर्ष, रा. जमनलाल बजाज वार्ड भंडारा यांनी त्यांच्या ॲक्टीव्हा मोटार सायकल क्र. एमएच ३६ जे ७६९० कि. २०,०००/—रु. च्या डिक्कीमध्ये सॅमसंग कंपनीचा मोबाईल ठेवुन मोटार सायकल ही कारधा शिवार येथील रोडच्या बाजुला उभी ठेवुन डेअरीफॉर्म मध्ये गेले होते. कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी पाहुन मोटार सायकल व मोबाईल एकुण कि.२६,०००/—रु. चा माल चोरुन नेला. असे फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३७९ भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**३) टिनाच्या पञ्यांची चोरी करण्याच्या प्रयत्नात मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २७/०६/०१६ रोजी २३.०० वा. दरम्यान फिर्यादी लिंगाजी सिताराम कापगते वय ५४ वर्ष, रा. सेंदुरवाफा यांचे सेंदुरवाफा टोल नाक्या जवळील व्दारकानगरी ले आउट मधुन दोन्ही आरोपीतांनी संगणमत करुन ले आउट मधील सिमेंट विटांनी तयार केलेल्या झोपडीच्या छताला लावुन असलेले टिनाचे पत्रे खाली काढुन टिनाचे पत्रे चोरुन नेण्याचा प्रयत्न केला. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पाटील पो.स्टे. साकोली हे करीत आहेत. सदर गुन्हयातील आरोपींना अटक करण्यात आली आहे.

**४) गाडीच्या कागदपत्राबाबत विचारणा केल्यावरून अश्लिल शब्दात शिवीगाळ व धमकी देवुन शासकिय कामात अडथळा निर्माण केला. :—**

दिनांक २८/०६/०१६ रोजी १८.१० वा. दरम्यान सर तर्फे फिर्यादी पोहवा. मते पो.स्टे. कारधा लोकसेवक हे आपले कर्तव्य बजावीत असतांना कमांडर वाहन क्र. एमएच ३३ ए १७७ च्या आरोपी चालकाने त्याच्या ताब्यातील वाहनामध्ये १+१९ प्रवासी बसवुन करचखेडा बस स्टॉप समोर सार्वजनिक रोडवर मिळुन आला, तेव्हा त्याला त्याचे लायसन्स, ईन्शुरन्स व गाडीचे कागदपत्राबाबत विचारणा करून गाडीचे चालान करण्यास बोलल्यावरून आरोपीने फिर्यादीच्या शासकीय कामात अडथळा करून

त्यांना ढकलढुकल करून अश्लिल शब्दात शिवीगाळ केली व सार्वजनिक ठिकाणी ''गाडी खाली दाबुन जिवाने मारून टाकीन'' अशी धमकी देवुन गाडीतील प्रवासी उतरवुन आपली गाडी ३ ते ४ वेळा मागे पुढे करून गाडी घेवुन गेला. असे फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३५३,२९४,५०६ भादंवी सहकलम ६६/१९२,१८३(१),१७७,१४९ सिएमव्हीआर/१७७,३२ आरआर/१७७ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

५) अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी. :–

दिनांक २८/०६/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. जवाहरनगर, करडी, तुमसर, आंधळगाव, गोबरवाही व लाखांदुर येथील परीसरातील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण १० गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ७४ लिटर हातभट्टी दारू कि. ३७५०/–रू. व ९०० मिली. देशी दारू कि. २५०/–रू. तसेच जुगारातुन कि. २६५/–रू. असा एकुण कि. ४२६५/–रू. चा माल जप्त करण्यात आला.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.